२००७-२००८

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग



## ७ वा वार्षिक अहवाल

१ एप्रिल २००७ -३१ मार्च २००८

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

## ७ वा वार्षिक अहवाल

## (एप्रिल २००७ - मार्च २००८)

वाय २१८४-१

# वार्षिक अहवाल - २००७-०८

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ क्रमांक |
|---|---|
| प्रस्तावना | (तीन) |
| १. परिचय | १ |
| २. आयोगाद्वारे तक्रारी हाताळणे | २ |
| ३. अटक उप समितीचे अधिकार | ७ |
| ४. मानवी हक्क शिक्षण आणि जागृती प्रोत्साहन | ९ |
| ५. प्रशासकीय काम आणि तर्कसंगतीचे समर्थन | १३ |
| ६. उदाहरणार्थी प्रकरणे | १५ |
| ७. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या डी. के. बसू प्रकरणामध्ये दिलेली अकरा मार्गदर्शक तत्वे | २१ |

# महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग

९, हजारीमल सोमानी मार्ग, छत्रपति शिवाजी टर्मिनस (व्हीटी) समोर, मुंबई - ४०० ००१.

दूरध्वनी : २२०३ ४२३३ ● फॅक्स : २२०९ १८०४


## प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचा हा सातवा वार्षिक अहवाल असून तो १ एप्रिल २००७ पासून तर ३१ मार्च २००८ या कालखंडासाठी आहे.

कलम २(१) (ड) मानवी हक्क संरक्षण हक्क कायदा १९९३ च्या व्याख्येनुसार मानवी हक्क म्हणजे असे हक्क की जे व्यक्तीचे जीवन, स्वातंत्र्य, समता आणि प्रतिष्ठेशी संबंधातील अधिकार, मानवधिकाराद्वारे आणि राज्य घटनेद्वारे निश्चित करण्यात आलेले आहेत आणि ज्यांची भारतरतील न्यायालयाच्याद्वारे अंमलबजावणी करता येते.नागरी समाजामध्ये लोकांचे हक्क हे सार्वभौम सत्तेद्वारा संरक्षित असतात आणि हे हक्क सर्व लोकांसाठी कुठलाही भेदभाव आणि पूर्वग्रह न ठेवता समान अविभाज्य आणि परस्परांवर अवलंबून असतात आणि प्रत्येक मानवाला प्रतिष्ठेचे जीवन जगण्यासाठी या अधिकाराची जाणीव असणे आवश्यक आहे.

आम्ही राज्य शासन येथे वर्ष २००७-०८ साठीचा सातवा वार्षिक अहवाल सादर करीत आहोत. मानवी हक्क कायदा १९९३ च्या संरक्षण कलम २८ नुसार विधानसभेच्या पटलावर ठेवला जाईल.

आज रोजी आयोगात कार्यरत असलेले मा.अध्यक्ष आणि सदस्य यांनी सप्टेंबर २०१३ मध्ये कार्यभार स्विकारला, आतापर्यंत २००७-२००८ ते २०१२-१३ पर्यंतचे वार्षिक अहवाल तयार करुन तत्कालीन सचिव श्री मफिउल हूसेन यांनी सरकारकडे सादर केले नव्हते, त्याची कारणे त्यांनाच माहिती असू शकतील. नवीन अध्यक्ष आल्यानंतर पूर्वीच्या वर्षाचे प्रलंबित असलेल्या वार्षिक अहवालाचे कार्य प्राधान्यक्रमाणे घेवून ते सादर करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| श्री. भगवंतराव डी. मोरे | न्यायमुर्ती श्री.एस. आर. बन्नुरमठ |
| सदस्य | अध्यक्ष |

स्थळ - मुंबई

दिनांक-

# भाग १

## परिचय

१.१ मानवी हक्कांच्या जगातील जुन्या आठवणींना उजाळा दिल्यास, ही संकल्पना कशी उत्क्रांत पावली हे पाहुया. मानवी हक्कांची कथा मानवाचीच आहे. वर्षानुवर्ष माणसाच्या स्वातंत्र्यासाठी संघर्ष होत होता. तो संघर्ष प्रत्येक माणसाच्या मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी होता. इंग्लडंचा राजा किंग जॉन याने अनेक प्राचीन कायद्यांचे उल्लंघन करून ज्या काही जुन्या रुढीपरंपरा प्रमाणे देशाचा राज्यकारभार केला जात होता. त्या परंपरा मोडीत काढल्या. अखेरीस त्यांच्या असंतुष्ट झालेल्या प्रजेने त्याला १२१५ मध्ये मॅग्ना कार्टा करारावर सह्या करण्यास भाग पाडले ज्या मध्ये असंख्य हक्कांची यादी दिली होती. १६८९ मध्ये हक्क विधेयकाने मानव हक्कांची संकल्पना स्थापन केली. फ्रेंचच्या राज्यक्रांतीमध्ये साम्राज्य उलथवून टाकले होते आणि प्रजासत्ताकाची स्थापना झाली त्याने जगाला स्वातंत्र्य, समता बंधुता या फ्रेंच संकल्पना दिल्या.

फ्रेंच राज्यक्रांतीने मुनष्याच्या हक्कांचे घोषणापत्र १७८९ मध्ये आणले. अमेरिकन स्वातंत्र्याच्या घोषणापत्राने (अमेरिकेचे हक्काचे विधेयक १७९१) ज्यातून उत्तर अमेरिकेतील ब्रिटिश कॉलनींचे स्वातंत्र्य जाहीर झाले. त्यात असे सांगितले की, ते सत्य स्वयंसिद्ध आहेत अशी आमची धारणा आहे, की सर्व माणसे जन्माला आली तेंव्हा सारखेच होते. निर्मात्याने त्यांना काही अहस्तांतरणीय हक्क दिलेले आहेत. त्यांच्यातील काही असे आहेत. जीवन, स्वातंत्र्य, आणि आनंदाने जगण्याचा अधिकार.

गुलामगिरी विरुद्ध लढाईत अमेरिकेचा ऱ्हास झाला आणि अतंतः प्रत्येक माणसाचे हक्क त्यांचा वंश विचारात न घेता मान्य केले गेले.

एखाद्याने भारतीय स्वातंत्र्य संग्रामाकडे काळजीपूर्वक पाहिल्यास, तो पाहू शकतो की तो मानवी हक्काचा लढा होता. बऱ्याच देशांमध्ये क्रांती झालेल्या आहेत. त्यापैकी काही चळवळी ह्या स्वातंत्र्यासाठी होत्या कारण लोकांची दडपशाही आणि त्यांचे शोषण केले जात होते आणि त्यांचे मूलभूत मानवी हक्क पायदळी तुडवले जात होते.

मानवी हक्क हा माणसाचा त्याला त्याच्या जन्मापासून मिळालेला हक्क आहे. मानव हक्कात सर्व मुलभूत स्वातंत्र्याचा समावेश होतो ते मानवाच्या प्रतिष्ठीत जीवन जगण्याच्या मागणीच्या आधारावर आधारीत आहेत, जिथे प्रत्येक मनुष्याचा आदर केला जातो. तसेच त्याची काळजी घेतली जाते. हे हक्क मुलभूत आहेत वास्तविक पाहता हे मानवाची प्रतिष्ठा साध्य करण्यासाठी आवश्यक आहेत तसेच संपूर्ण मानव जातीची जोपासना करण्यासाठी आवश्यक आहेत. मानवी हक्क हे अहस्तांतरणीय, एकमेकांवर अवलंबून असणारे, नैसर्गिक मूलभूत आहेत.

१.२ संयुक्त राष्ट्रांनी १९४८ च्या मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यात काही हक्क नमूद केले आहेत आणि असे जाहीर केले आहेत की ते प्रत्येक मनुष्याला कोणत्याही बाबीत भेदभाव न करता काही मूलभूत हक्क आहेत. या हक्कांची प्रत्येक राष्ट्रांनी हमी दिली पाहिजे आणि त्याचे संरक्षण केले पाहिजे त्या हमीनाम्याचे त्यानंतर पुढे १९६६ मध्ये झालेल्या नागरी, राजकीय हक्क आणि आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्क करारात अनुष्ठान केले गेले. आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्काचा करार असे सांगतो की हक्कांना कधीही मर्यादा आणता येणार नाहीत किंवा आणिबाणीच्या परिस्थितीत सुद्धा निलंबित करता येणार नाही. तो करार जीवन जगण्याचा अधिकार, काम मिळण्याचा अधिकार, समान काम समान वेतनाचा अधिकार, अल्पसंख्याकांना त्यांच्या स्वतःच्या संस्कृती, धर्म आणि भाषेप्रमाणे जगण्याचा अधिकार या सर्व हक्कांना ओळखतो नागरी आणि राजकीय हक्कांचा करार लोकांत कोणत्याही प्रकारचा भेदभाव करण्याच्या पूर्वीच्या शासनाच्या अधिकृत धोरणाचा प्रतिबंध करतो आणि लोकांना त्यांचे सर्व अधिकार त्यांच्यात कोणत्याही प्रकारे वंश, रंग, भाषा, लिंग, धर्म अशा कोणत्याही आधारावर लोकांमध्ये भेदाभेद न करता त्यांचे हक्क उपभोगता येतील याबाबत सांगतो.

१.३ जर आपण मानवी हक्कांचा जागतिक जाहिरनामा आणि दोन करार यांची भारतीय कायद्यांबरोबर तुलना केल्यास आपल्या असे लक्षात येईल की, आपल्या घटनेनेसुद्धा या आधी मानवाचे हक्क त्याचे मूलभूत अधिकार म्हणून भाग ३ मध्ये दिलेले आहेत आणि त्या हक्कांच्या संरक्षणसाठी यंत्रणा दिलेल्या आहेत.

आपल्या घटनेने सर्व भारतींयाना त्यांच्या सर्व मूलभूत अधिकारांची आणि सर्व मानव एकसमान आहेत अशा समाजाची आणि तेथील नागरिक एकसमान आणि स्वतंत्र्य असल्याची हमी दिली आहे. आपली घटना माणसाची एकसमानता त्यांचा कायद्यासमोर एकसमान दर्जा, कायद्यापुढे समानता याबद्दल तरतूद, जीवन जगण्याचा अधिकार, वैयक्तिक स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, बोलण्याचे स्वातंत्र्य, विश्वास स्वातंत्र्य सांगते. घटनेने याबाबतही तरतुद केली आहे की, एखादा तक्रारदार नागरिक ज्याच्या हक्कांचे उल्लंघन झालेले असेल तो घटनेच्या कलम ३२ प्रमाणे सर्वोच्च न्यायालय आणि संबंधित राज्याच्या मा. उच्च न्यायालयाकडे कलम २२६ प्रमाणे मानवी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी जाऊ शकतो.

१.४ मानवी हक्क, आंतरराष्ट्रीय बिल, आंतरराष्ट्रीय समझोता आणि सामान्य विधानसभा यानी दिलेला एक ठराव अनौपचारीक नाव देवून संयुक्त राष्ट्रांनी स्थापन केले. त्या त्यांच्या दोन वैकल्पिक शिष्टाचारासह (१९४४ मध्ये दत्तक) मानवी हक्क, वैधिक घोषणा पत्र, सामाजिक व राजकीय हक्क, आंतरराष्ट्रीय करार (१९६६) यांचा तसेच आर्थिक सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकार (१९६६) आंतरराष्ट्रीय करार समावेश आहे. १९७६ मध्ये दोन करारानी शक्तिनिशी प्रवेश केला आणि त्यानंतर त्या करारावर देशाने स्वाक्षऱ्या केल्या.

१.५ सुरवातीला बिल ऑफ राईटच्या स्वरूपाबाबत वेगवेगळे दृष्टिकोन व्यक्त केले गेले. १९४८ च्या जनरल असेंब्लीमध्ये असे योजिले होते बिल ऑफ राइटमध्ये यू.डी.एच.आर च्या समावेश करावे. एक करार आणि अमंलबजावणीचे उपाय या स्वरूपात मसुदा समितीने दोन दस्तऐवज तयार करण्याचे ठरविले. एक घोषणा पत्राच्या स्वरूपात ज्यात सामान्य तत्त्वे किंवा मानवझिकारांचे मानदंड विशद केले जातील आणि दुसऱ्या कराराच्या स्वरूपात ज्यत विशिष्ठ हक्कांची व्याख्या देणे आणि त्यांच्या मर्यादा सांगणे या स्वरूपात स्पष्ट करता येईल. त्याप्रमाणे समितीने मानवी हक्क आयोगाकडे जागतिक घोषणापत्र आणि मानवी हक्कांवरील जागतिक करार यांचा मसुदा पाठविला. तिच्या दुसऱ्या सत्रात डिसेंबर, १९४७ मध्ये तयार होणाऱ्या दस्तऐवज उपयोगात आणण्याचे ठरविले. एक गट घोषणापत्र, दुसरा गट करार आणि तिसरा गट अमलबजावणी यासाठी तीन कार्यकारी गटांची स्थापना केली. आयोगाने घोषणापत्राच, सुधारित मसुदा सरकारकडून प्राप्त झालेल्या टिप्पण्या विचारात घेऊन मे/जून, १९४७ रोजी तयार केला ते घोषणापत्र आर्थिक सामाजिक मंडळ यांच्यामार्फत पॅरिस येथील जनरल असेंब्लीकडे सादर केला.

१.६ मानवी हक्क आयोगाने त्यांच्या आदेशांना सुसंगत असे ज्यात महत्त्वाचे मानवी हक्क समाविष्ट आहेत ते स्वतःहुन किंवा जे मुद्दे नागरी समाज, मिडीया, संबंधित नागरिक किंवा तज्ज्ञ सल्लागार त्यांची आयोगाने दखल घेतली. मानवी हक्क आयोगाचा प्राथमिक केंद्रबिंदू समाजातील सर्व घटकांचे विशेषतः असुरक्षित गट यांचे मानवी हक्क मजबूत करणे हा आहे.

## भाग २

## आयोगाद्वारे हाताळलेल्या तक्रारी

हे आयोगाच्या कामाचे सातवे वर्ष आहे आणि मागील वर्षीच्या कामाच्या तुलनेत सध्याच्या (चालू) वर्षातील काम हे जलद वेगाने वाढत आहे कारण सन्माननीय सदस्यांची जी पदे निवृतीमुळे रिक्त होती ती पदे भरली गेली. त्यामुळे तक्रारींच्या संख्येत हळूहळू वाढ झाली आहे. या आयोगाने लोकांमध्ये केलेल्या जनजागृतीमुळे आयोगात दाखल होणाऱ्या तक्रारींच्या संख्येत प्रत्येक वर्षी हळूहळू वाढ झालेली आहे.

**आकडेवारी**

२.२ चालू अहवाल वर्षी, म्हणजे २००७-०८ साली आयोगाकडे ६४७३ नवीन प्रकरणे प्राप्त झाली. आयोगाकडे मागील वर्षापासून ४९४८ तक्रारीची प्रलंबित होत्या. १ एप्रिल २००७ ते ३१ मार्च २००८ दरम्यान ५९७४ तक्रारीं निकाली काढल्या त्यानंतर ५४४७ या वर्षाअखेर प्रकरणे प्रलंबित राहिली.

२.३ चालू वर्षाच्या कालावधीत १९७ प्रकरणांमध्ये संबंधित सरकारी सत्तांना शिफारशी/दिलासा देण्याचे आदेश केले होते.

२.४ सन २००७-०८ दरम्यान १४० नवीन तक्रारी आयोगाच्या अन्वेषण (विभाग) कडे पाठविण्यात आल्या होत्या. आणि मागील वर्षाची ७३ प्रकरणे प्रलंबित आहेत. ह्या एकूण २१३ प्रकरणांपैकी १९८ प्रकरणे तपासणीसाठी या वर्षी पाठविण्यात आली, आणि या वर्षाच्या शेवटी १८ प्रकरणे प्रलंबित आहेत.

२.५ आयोगाने या वर्षात ५ प्रकरणांमध्ये स्वतःहून दखल घेतली.

**तक्रारीचे स्वरूप :—**

२.६ आयोगाला प्राप्त झालेल्या ६४७३ प्रकरणांचा एक विश्लेशणात्मक अभ्यास करण्यात आला आणि खालील विभाजन केले असता त्या प्रकरणांची खालीलप्रमाणे वर्गवारी केली आहे.

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (कार्यपद्धती) विनिमय २०११ प्रमाणे दखल घेण्यात येणारी प्रकरणे :—**

१. **पोलीस दलाच्या विरुद्ध तक्रारी** :—या वर्गात पोलिसांनी त्यांच्या अधिकाराचा गैरवापर करून गुन्हा नोंद न करणे तसेच प्रकरणात गुंतवणे बेकायदेशीर अटक, मारहाण करणे भष्ट्राचार इत्यादी प्रकारच्या तक्रारी ............ १८१४ प्रकरणे

२. **स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विरुद्ध** :—या वर्गात ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, नगरपरिषदा, महानगरपालिका इ. विरुद्ध तक्रार. ............ ४७१ प्रकरणे

३. **इतर सरकारी विभागांविरुद्ध** :—गृह विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, समाजकल्याण विभाग तसेच इतर विभागाविरुद्ध तक्रारी या वर्गात समाविष्ट करण्यात आल्या आहेत :— ............ ४७८ प्रकरणे

४. **अनुसूचित जाती/अनु जमाती किंवा इतर अल्पसंख्यांक यांच्यावरील अत्याचारासंबंधी तक्रारी:—** ............ १०८ प्रकरणे

५. **कैद्यांच्या मानवी हक्क उल्लंघनसंबंधी तक्रारी :—** ............ ४५प्रकरणे

६. **महिलांवरील हिंसाचार आणि अन्यायसंबंधी तक्रारी :—**या वर्गात छळ, बलात्कार, त्रास आणि इतर तक्रारी अशा तक्रारी ज्या तक्रारी तक्रारदार महिलांनी योग्य त्या प्राधिकरणांद्वारे माहिती घेतली जात नाही. दाखल करून सुद्धा त्याची दखल घेतली नाही :— ............ १५७ प्रकरणे

७. **जनहित संबंधीच्या तक्रारी :—** ............ १६६ प्रकरणे

**महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग (कार्यपद्धती) विनिमय २०११ प्रमाणे दखल घेता न येणारी प्रकरणे :—**

१. नोकरीतील घटनांच्या संदर्भातील तक्रारी ............ ६३८ प्रकरणे

२. कौटुंबिक वादासंबंधी तक्रारी ............ १७७ प्रकरणे

३. जमिनीच्या वादासंबंधी तक्रारी ............ २८४ प्रकरणे


४. खाजगी व्यक्तींविरुद्ध तक्रारी ............ ९७६ प्रकरणे

५. खाजगी मालक व इतर कामगार यांच्यातील मुद्यासंबंधी तक्रारी ............ ३१ प्रकरणे

६. बँका, कर्जाची वसुली, कर्ज इ. विरुद्ध तक्रारी ................ १२८ प्रकरणे

७. कोठडीतील मृत्युसंबंधीच्या तक्रारी ................ १८१ प्रकरणे

८. इतर तक्रारी ................ ८१९ प्रकरणे




२.७ वर्षामध्ये पोलीस दलाविरुद्ध अनेक मोठ्या संख्येने तक्रारी येत आहेत. ह्या तक्रारी तुलनात्मकदृष्टया जास्त आहेत, हे लक्षात येत आहे. मागील काही वर्षांपासून पोलीस दलाविरुद्धच्या तक्रारी जास्त दिसून आल्या आहेत ही बाब गंभीर आहे. त्यामुळे त्या कमी करण्यासाठी पोलीस व सर्व संबंधितांना योग्य प्रशिक्षण देण्याची तसेच जागृतीचे कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

**आयोगाने स्वयंखुद्द दखल घेतलेली माहिती.**

२.८ मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ कलम १२(अ) प्रमाणे तथाकथित मानवी हक्क उल्लंघनाच्या किंवा मानवी हक्कांचे उल्लंघन झाले आहे असे दिसून आल्यास अशा प्रकरणांमधील तक्रारींची स्वयंखुद्द दखल घेण्याचे आयोगाला अधिकार आहेत. चालू अहवाल वर्षी आयोगाने ५ प्रकरणांमध्ये स्वयंखुद दखल घेतली आणि ह्या प्रकरणांमधील सारांश थोडक्यात खाली दिला आहे.

**प्रकरण क्र. १ :—** मराठी दैनिक सकाळ या वृत्तपत्रातील एक लेख पाहण्यात आला, जो एका तरुण मुलाबाबत होता, ज्याचे नाव वीरधवल खाडे असे असून तो एक आंतरराष्ट्रीय दर्जाचा उत्कृष्ट जलतरंग पटू आहे. जो आर्थिक पाठबळ नसल्यामुळे त्यांच्या क्षेत्रातील आवश्यक असलेले प्रशिक्षण तो प्राप्त करु शकत नव्हता. पोहोण्यासारख्या कमी लोकप्रिय खेळाच्या प्रसाराबाबत सरकारी उदासिनतेबाबत आरोप करणारा तो लेख होता. आयोगाने सदर प्रकरणाबाबत माहिती घेतली आणि क्रिडा, संस्कृती आणि युवक विभागास नोटीस जारी केली. आयोगाची नोटीस जारी झाल्यानंतर सदर प्रकरणाबाबत पुढील घटना मन उल्हासित करणारी आहे कारण सदर युवकास मदत करण्यासाठी अनेक/ पुष्कळ प्रायोजक पुढे आले जेव्हा शासनाच्या योग्य त्या प्राधिकरणाने सदर प्रकरणामध्ये लक्ष घातले.

**प्रकरण क्र. २ :—** दिनांक ३ नोव्हेंबर २००७ च्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये एक लेख पाहाण्यात आला होता. ज्यामध्ये एका सॉफ्टवेअर व्यावसायिकाला ५० दिवसांच्या कालावधिसाठी एक आरोपी म्हणून ताब्यात घेण्यात आले होते. जो गुन्हा तांत्रिक त्रुटींमुळे झाला होता.

आयोगाने या प्रकरणाची स्वयंखुद्द दखल घेतली आणि गृह विभागाकडून अहवाल मागविला. ही बाब माननीय अध्यक्ष न्यायमूर्ती क्षितिज व्यास आणि सन्माननीय सदस्य श्री. सुभाष लाला यांच्या खंडपिठाने ऐकून घेतली. खंडपिठाला असे आढळून आले की, सदर अटकेस पोलीस अधिकारी जबाबदार आहेत. तसेच, भारती एअरटेल कंपनीने सुद्धा चुकीची माहिती दिल्यामुळे ती सुद्धा तेवढीच जबाबदार आहे. खंडपीठाने अशी शिफारस केली की नुकसानभरपाई म्हणून एअरटेल कंपनीने रुपये २ लाख अदा करावेत आणि त्या दरम्यान संबंधित पोलीस अधिकारी निवृत झाल्यामुळे त्याच्यावर कारवाई करण्याची बाब राज्य सरकारवर सोडून दिली.

**प्रकरण क्र. ३ :—** आयोगाचे अध्यक्ष ह्यांनी दैनिक वृत्तपत्र " मुंबई मिरर " यात दिनांक ६ नोव्हेंबर २००७ रोजी आलेल्या बातमीची माहिती मागविली. त्यानुसार योगिता हिंदोळे वय वर्ष १३ या मुलीला ती सदर गुन्हा कबूल करीत नव्हती म्हणून बदलापूर ग्रामिण पोलीसांकडून तिला मारहाण करण्यात आली. जिल्हा परिषद ठाणे येथील कर्मचारी शिक्षिका यांची चेन चोरल्याचा आरोप सदर मुलीवर लावण्यात आला आहे.

आयोगाने सदर बाबीला अनुसरुन माहिती ऐकून घेतली आणि आयोगाने प्रथमदर्शी असा निष्कर्ष काढला की, सदर मुलीच्याबाबत मानवी हक्काचे उल्लंघन झाले होते. दिनांक १२ डिसेंबर २००६ रोजीच्या आदेशानुसार अशी शिफारस करण्यात आली की, गृह विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी प्रत्येकी रुपये ५००० सदर पिडित व्यक्तीस द्यावेत आणि संबंधित पोलीस अधिकारी आणि संबंधित शिक्षक यांचे विरुद्ध प्राथमिक स्वरूपाची चौकशी सुरू करण्यात यावी.

**प्रकरण क्र. ४ :—** स्थानिक राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांनी बेबंदशाहीपणे एका टॅक्सी ड्रायव्हरला व काही निष्पाप लोकांना दिनांक ३ फेब्रुवारी २००८ रोजी लक्ष्य केले व त्यांच्यावर हल्ला करून बेदम मारहाण केली. जी घटना दूरदर्शनवर दाखविली आणि दिनांक ४ फेब्रुवारी २००८ चे वृतपत्रांमध्ये प्रसारित झाली त्या घटनेबद्दल मा. आयोगाच्या अध्यक्षांनी स्वतःहून दखल घेतली. आणि पोलीस आयुक्त यांना नोटीस जारी केल्या. आयोगाने प्रतिवाद्यांना विचारले होते की मुंबई आणि राज्यातील इतर भागांमध्ये असे अनुचित प्रसंग टाळण्यासाठी पोलिसांनी कोणती पावले उचलली याची माहिती सादर करावी.

सर्व प्रतिवाद्यांनी अहवाल दाखल केले, मा. अध्यक्ष, न्यायमूर्ती क्षितिज आर. व्यास आणि मा. सदस्य श्री. सुभाष लाला यांच्या खंडपीठाने या प्रकरणात समावेश असलेली सर्व माहिती सविस्तरपणे ऐकूण घेतली. आणि आयोगाने दिनांक ३ फेब्रुवारी २००८ रोजी घडलेल्या घटनेस जबाबदार असणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कारवाई करण्याच्या शिफारसी केल्या तसेच प्रतिबंधात्मक स्वरूपाच्या अशा तीन शिफारशी करण्यात आल्या होत्या.

**प्रकरण क्र. ५ :—** मा. अध्यक्षांनी यांच्याकडून " मुंबई मिरर " या वर्तमानपत्रात दिनांक २७ फेब्रुवारी २००८ रोजी आलेल्या या बातमीची स्वयंखुद्द दखल घेतली. " भयंकर वाटणाऱ्या जेलरच्या तावडीतून सुटका करून घेण्यासाठी कैद्याची आत्महत्या " आधारवाडी तुरुंग, कल्याण येथील दोन कैद्यांनी तुरुंग अधिकारी दररोज देत असलेल्या यातनातून सुटका करून घेण्यासाठी आत्महतेचा प्रयत्न केला. या प्रकरणाची तपशीलवार चौकशी करण्यात आली आणि असे आढळून आले की, त्या कैद्यांनी स्वतःच्या वैयक्तिक वैफल्यातून आत्महत्येचा प्रयत्न केला आणि त्या आत्महत्या तुरूंग अधिकारी यांचा तथाकथित छळ असल्यामुळे झाला नव्हता. कारण ते कायदा सुव्यवस्था या संदर्भात कर्तव्य करीत होते/ बजावत होते. माननीय अध्यक्ष न्यायमूर्ती श्री. क्षितिज आर व्यास यांनी असे नमूद करून प्रकरण संपवले. कायदा शिस्त व सुव्यवस्था राखण्यासाठी मानवीय दृष्टीकोन लक्षात ठेवलाच पाहिजे.

**कोठडीतील मृत्यु प्रकरणे :—**

२.१० आयोगाला चालू अहवाल वर्षामध्ये १८१ कोठडीतील मृत्यू प्रकरणांची माहिती मिळाली. त्यात १२० मृत्युची नोंद न्यायालयीन कोठडीमध्ये, १५ मृत्युची नोंद बेगर्स होममध्ये २९ जणांच्या मृत्युची नोंद बाल सुधार गृहामध्ये आणि १७ जणांचा मृत्यू पोलीस कोठडीत झाल्याची नोंद आहे.

## भाग - ३

## अटक उपसमितीचे अधिकार

३.१ या प्रकरणात मा. सुप्रिम कोर्टाने दिलेल्या २९ ऑक्टोबर २००१ रोजीच्या आदेशाने निर्देशात असे निरीक्षण नोदंविले आहे की, एम. पी. क्र. १२७०४/२००१ डी. के. बसूच्या या प्रकरणातून उद्‌भवलेल्या प्रकरणांवर उल्लेख केलेल्या २९ ऑक्टोबर २००१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने अशा अर्थाचे मार्गदर्शक तत्त्वे सांगितले.

त्याची योग्य प्रकारे खात्रीने अमंलबजावणी करावी आम्हाला आता असे वाटते की डि.के. बसू प्रकरणातील ११ मार्गदर्शक तत्त्वांची इतर कायदेशीर बाबतीत याचे अमंलबजावणीचे काम सर्व राज्य सरकारे आणि केंद्र शासन प्रदेशात स्थापन झालेल्या मानवी हक्क आयोगाकडे देण्यात यावे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने प्रत्येक राज्याच्या राज्य मानवी हक्क आयोगास एक "उप समिती" स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. संबंधित आयोगाच्या दृष्टीने त्यासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टी केल्या जात आहेत की नाही याची देखरेख होत असे. असे लक्षात आले आहे की, समितीसाठी असा पर्याय खुला असेल की सदर गरजांच्या अंमलबजावणीबाबतचा दृष्टीकोन अचौनक तपासणीचा पर्याय समितीसाठी खुला असेल.

त्यानुसार महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाने एक उपसमिती स्थापन केली आहे.

**संबंधित प्राधिकरणाकडून प्रतिसाद :**

३.२ त्यानुसार माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ११ मार्गदर्शक सूचनांच्या अमंलबजावणी संदर्भात माननीय आयोगाचा निर्देशित केलेला त्रैमासिक अहवाल, महाराष्ट्रातील जिल्हा पोलीस अधीक्षकांपासून प्राप्त आहेत.

**अचानक भेट :**

३.३ सर्वोच्च न्यायालयाच्या ११ मार्गदर्शक तत्त्वाचे योग्य प्रकारे पालन होते की नाही, यासाठी माननीय अध्यक्ष व इतर महत्त्वाच्या सदस्यांनी सन २००७-२००८ मध्ये पोलीस ठाणे परीरक्षक गृहांना भेटी दिल्या.

| अनुक्रमांक (१) | पोलीस स्टेशन कोठडीतील संस्था (२) | जिल्हा (३) | भेट दिलेली तारीख (४) | माननीय सदस्य (५) |
|---|---|---|---|---|
| १ | येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे | पुणे | १३/०२/०८ | मा. अध्यक्ष न्यायमूर्ती, श्री. क्षितिज आर. व्यास |
| २ | पंचवटी पोलीस स्टेशन | नाशिक | २६/०५/०७ | मा. सदस्य, न्यायमूर्ती श्री. व्ही. जी. मुन्शी |
| ३ | पुणे, आयुक्त | पुणे | १५/०६/०७ | मा. सदस्य न्यायमूर्ती श्री. व्ही. जी. मुन्शी |
| ४ | सुधारणा गृह, नाशिक | नाशिक | २६/०५/०७ | मा. सदस्य न्यायमूर्ती श्री. व्ही. जी. मुन्शी |
| ५ | नागपूर मध्यवर्ती कारागंह | नागपूर | १६/०७/०७ | सन्मान सदस्य श्री. टी. सिंगारवेल |
| ६ | जिल्हा कारागृह, सातारा | सातारा | २२/०२/०७ | मा. सदस्य श्री. टी. सिंगारवेल |
| ७ | शिर्डी पोलीस स्टेशन | अहमनदगर | २१/०८/०७ | मा. सदस्य श्री. सुभाष लाला |
| ८ | मुरूड-जंजिरा पोलीस स्टेशन | रायगड | १९/०८/०७ | मा. सदस्य श्री. सुभाष लाला |
| ९ | लोणावळा पोलीस स्टेशन | पुणे | ०६/०९/०७ | मा. सदस्य श्री. सुभाष लाला |
| १० | हॉस्टेल | पुणे | २६/०१/०८ | मा. सदस्य श्री. सुभाष लाला |

**निरीक्षण आणि शिफारस :—**

३.४ माननीय अध्यक्ष न्यायमूर्ती क्षितिज आर. व्यास यांनी येरवडा तुरूंग, पुणे येथे भेट दिली.

माननीय सरन्यायाधीश, मुंबई उच्च न्यायालय यांना मा. अध्यक्षांनी कैदी, त्यांचे गुन्हे आणि त्यांचा तुरूंगातील कालावधी यासंबंधी एक पत्र आणि त्यासोबत संबंधित माहितीचा तक्ता पाठवून त्यांचे लक्ष वेधले आणि त्यांना विनंती केली की, संबंधित कोर्टानी न्यायबंदी कैद्यांची प्रकरणे एक विहित कालावधीत सुनावणी घेऊन निकाली काढावीत, कारण बरेच न्यायबंदी यांनी केस चालवून त्याला होऊ शकणाऱ्या शिक्षेपैकी २/३ कालावधी पूर्ण केलेला आहे.

## भाग - ४

## मानवी हक्क शिक्षण आणि जागृती प्रोत्साहन

४.१ महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग ही संस्था मुख्यतः सरकारी नोकरांनी मानवी हक्कांचे उल्लंघन केलेल्या प्रकरणांसंबंधी काम पाहते. या आयोगाला न्यायालयासारखे आदेश करण्याचे अधिकार आहेत. पण ते आदेश शिफारशींच्या स्वरुपात करता येतात पण ते आदेश पाळलेच पाहिजेत असे अनिवार्य नाही. या कायद्याच्या विविध तरतुदी लक्षात घेता बऱ्याच तक्रारींची दखल घेता येत नाही.

४.२ जे लोक त्याच्या मानवी हक्कांचे उल्लंघनास सामोरे गेले आहेत किंवा ज्यांचे हक्क नाकारले गेले आहेत अशा लोकांना अनेकदा सूड घेण्याची तीव्र इच्छा असते. त्याची एक ज्वलंत इच्छा अशी पाहण्याची असते की, त्यांना क्रुरतापूर्वक त्रास देणाऱ्यांची निंदा केलेली आहे जेव्हा एखादी प्रणाली त्यांना जे आवश्यक आहे ते देण्यास असमर्थ ठरते तेव्हा ते त्या प्रणालीच्या बाहेर जाऊन अवैध्य मार्गाचा वापर करून शेवटी अंतिम नाशाकडे जातात.

४.३ म्हणूनच खालच्या स्तरापासून काम करणे आवश्यक आहे जेथून तक्रारदारांच्या तक्रारी आल्यास आयोगकडे संपर्क साधू शकतात. मानवी हक्काबद्दलच्या आणि त्यांच्या उल्लंघनाच्या विरोधात शिक्षणाचा प्रचार जागरूकता निर्माण करण्याची आवश्यकता आहे.तक्रारीचे निवारण करण्यासाठी असलेले मंच.

४.४ या हेतूने आयोगाने विविध उपक्रम हाती घेतले आहेत आणि त्यात कित्येक कार्यशाळा व सेमिनार होतात.

**शैक्षणिक संस्थामध्ये जागृती सादरीकरण :—**

४.५ मागील वर्षी म्हणजे २००६-०७ पासून टाटा इन्स्टिट्युट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांनी आयोगाचे २ सामाजिक कार्य करणारे विद्यार्थी यांना आयोगाकडे पाठविले होते. सामाजिक कार्य करणारे विद्यार्थी आयोगाच्या कार्यालयात उपस्थित राहून त्यांचे स्वतःच्या प्रकल्पाचे काम करून त्या व्यतिरिक्त आयोगाच्या कामात मदत करतात.

४.६ या अहवाल वर्षात आयोगाने मानवाधिकाराबद्दल मूलभूत माहिती देणारे सादरीकरण केले. त्यात विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध संस्थांनी भाग घेतला. पदवीधर पातळीवरील विद्यार्थी सामुहिक सादरीकरणाचे लक्ष म्हणून ओळखले गेले होते. या लक्ष समुहाचे मुख्य उद्देश असा होता की, त्यांनी युवक वर्गापर्यंत पोहचावे. ज्याच्याकडून अशी अपेक्षा होती की, ही महत्वाची माहिती या एन. एन. एस. उपक्रम पथनाट्य, शैक्षणिक पातळीवर चर्चा या माध्यमातून प्रसार करावा.

४.७ सादरीकरणात प्रामुख्याने मानवी हक्क कायदा, १९९३ च्या संरक्षण आधारित वस्तुस्थितीसंबंधी माहितीने लक्ष केंद्रीय केले. सादरीकरण सोपे व मैत्रिपूर्व केले होते. ज्यात तक्रारी दाखल करण्याची पद्धत आणि इतर अत्यावश्यक माहिती दिली जात होती. १७ महाविद्यालये शैक्षणिक संस्था आणि सुमारे ५०० विद्यार्थी या उपक्रमाद्वारे त्यांच्यापर्यंत पोचता आले.

४.८ विद्यार्थी आणि संस्थांकडून त्याला चांगल्या प्रकारचा प्रतिसाद मिळाला आणि राज्य मानवाधिकार आयोगाचे पुढील कार्यक्रम त्यासाठी पाठिंबा देण्याचे व संर्पकात राहण्याची तयारी दाखविली.

४.९ सामाजिक रॅपोरचर यु. एन. ओ. श्री. पॉल हेट त्यांनी दिनांक २८ नोव्हेंबर २००७ रोजी आयोगाला भेट दिली. त्यांनी आपल्या कामाची मा. अध्यक्ष, सदस्य आणि आयोगाच्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. सामाजिक रॅपॉरर्चजच्या ध्येयानुसार त्याने आपले भारतीय माता मृत्यु संबंधित विषयावर लक्ष केंद्रीत केले होते. आरोग्य, सहकार आणि संवाद यांचे एकमेकांशी असलेले सलोख्याचे संबंध योग्य संदर्भात समजणे हे त्याचे ध्येय, उद्देश होते. माता मृत्यू दर कमी करणे आणि विधायक शिफारशी करणे यासाठी भारताने पावले उचलली होती. असे असले तरी आयोग आणि सामाजिक रेपेरचरच्या कामाचे क्षेत्र विविध आणि विभिन्न होते. तरीही थोडक्यात आयोगाची कामकाज करण्याची पद्धत सांगण्यात आली आहे आणि आयोगाने विविध मुद्दे हाताळले.

**अशासकीय संस्थांच्या मान्यता :—**

४.१० मानवी हक्क कायद्याच्या संरक्षण कलम १२(१) १९९३ अन्वये मानवी हक्काच्या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय संस्था आणि मानवी हक्कांच्या संर्दभात काम करणाऱ्या संस्था यांच्या प्रयत्नाना प्रोत्साहित करण्यासाठी आयोगाला अधिकार आहेत. आयोगाला त्याच्या कामकाजात व इतर बाबीमध्ये मदत करणाऱ्या अनेक अशासकीय संस्था आहेत असे लक्षात आले आणि त्यांच्या मानवी हक्काच्या उल्लंघन निवारणेसाठी सार्वजनिक मदत व फसवणूक करणे, पैशाची चटक लावणे, दिशाहभूलमुळे अशी उद्दिष्टे बाळगून काम करणाऱ्या संस्था अस्तित्वात आहेत.

४.११ आयोगाचे असे मत होते की, मानवी अधिकाराच्या निवारण केलेली कोणत्याही प्रकारची फसवणूक खपवून घेतली जाणार नाही. हे ध्येय/उद्देश मनात ठेऊन आयोगाने दिनांक १५ नोव्हेंबर २००६ रोजी एक सभा आयोजित केली होती. त्यावेळी आयोगाच्या मा. सदस्यांव्यतिरिक्त खालील इतर व्यक्तीसुद्धा हजर होत्या.

श्री. व्ही. के. अगरवाल (आय.ए.एस.), प्राचार्य, सचिव प्लॅनिंग विभाग मंत्रालय.

श्री. व्ही. रामाणी (आय.ए.एस,) वरिष्ठ संचालक, यशदा, पुणे

डॉ. नायर, यशदा पुणे.

मिस रोशनी नायर, श्री. आय. ए. एस, मुंबई.

सिस्टर मेरी अल्फान्सो - उप प्राचार्य, निर्मला निकेतन मुंबई.

४.१२ महाराष्ट्र शासनाकडून यशदाला विश्वसनीय स्वयंसेवक संस्था ओळखण्यासाठी अधिकार देण्यात आले आहेत. या संस्था स्वेच्छेने स्वतः त्यांची संस्था संलग्न करून घेण्यासाठी प्रस्ताव देतात. भविष्यात आयोगाला मदत होईल या दृष्टीने यशदाला अधिकृत संस्थांची एक यादी तयार करण्याची विनंती केली होती.

**विस्थापित व्यक्ती आणि त्यांचे पुनर्वसन व मदत या राष्ट्रीय परिषद :—**

४.१३ राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाने दिनांक २४-२५ मार्च २००८ रोजी नवी दिल्ली येथे एक परिषद आयोजित केली होती त्यात आयोगाने सहभाग घेतला. विकास आधारित विस्थापन विरोध बाबतीत नैसर्गिक संकटे, आणि विस्थापन खात्यातील विस्थापन संबंधित चर्चा करण्यात आली होती.

४.१४ सर्व प्रकारच्या बाबतीत शिफारशी पुनर्वसन विस्थापन केले होते. तसेच या परिषदेमध्ये खालीलप्रमाणे शिफारसी करण्यात आल्या होत्या :—

(१) राष्ट्रीय मदत व पुनर्वसन धोरणामध्ये मूलभूत तत्त्वे पुनर्वसन विधेयक बील, २००७ समाविष्ट करणे आवश्यक आहे.

(२) निर्वासित लोकांशी प्रकल्प फायदे न्यायसंगत सहभाग यांची खात्री होण्यासाठी विस्थापित लोकांसह एक यंत्रणा तयार करावी.

(३) विकास संबंधित विस्थापना बाबतीत संबंधातील मार्गदर्शक तत्त्वे असे असावे की, किमान लोक विस्थापित व्हावीत.

(४) सामाजिक परिणाम मूल्यांकन आणि स्थानिक लोकांच्या अपेक्षा त्यांचा संवाद या माध्यमातून आणि नागरी समाज गट याचा सर्वोत्तम परिणाम दिसून येतो व स्थानिक लोकांच्या संपर्कात लोक जातात.

(५) नैसर्गिक किंवा मानव निर्मित संकटे किंवा संघर्ष यासाठी येथे दूरदृष्टीची गरज आहे. जे विस्थापनाच्या प्रतिबंधाच्या पैलूवर भर देतात.

(६) केंद्रीय मदत निधी (सी.आर.एफ.) याचे केंद्रीय मदत व पुनर्वसन निधी असे नामकरण (सी.आर.एफ.) केले पाहिजे आणि आर्थिक विस्थापित व्यक्ती आणि पुनर्वसनासाठी निधी बाजूला ठेवला पाहिजे.

(७) पूर्व विस्थापना मदत व पुनर्वसन आधारित पाहिले पाहिजेत. एक प्रशासकीय/गव्हर्नन्स इतर दृष्टीकोनापेक्षा लाभार्थांच्या गरजा/समस्यांवर लक्ष केंद्रीत करतो.

(८) पूर्व विस्थापन, आणि पुढील विस्थापना संबंधित प्राधिकरणांना मानवी हक्काची क्षमता वाढविण्याच्या माध्यमातून संविनय झाले पाहिजे.

**पोलीस अधिकारी व इतर अधिकाऱ्यांची कार्यशाळा :—**

४.१५ आयोगाने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठ, नाशिक यांच्या सहकार्याने मानवाधिकार कार्यशाळा आयोजित केली.

४.१६ दिनांक ४ एप्रिल २००७ रोजी घेतलेली नाशिक विभागाच्या हद्दीतील पहिली कार्यशाळा पोलीस निरीक्षक उपअधीक्षक आणि नाशिक पोलीस आयुक्तालयातील पोलीस अधिकारी यांच्यासाठी घेण्यात आली होती.

४.१७ दिनांक ५ एप्रिल २००० रोजी दुसऱ्या दिवशी कार्यशाळा कार्यकारी दंडाधिकारी, तहसिलदार, आणि नाशिक विभागातील इतर अधिकारी यांचेसाठी होती.

४.१८ आयोगाच्या सन्माननीय सदस्य श्री. सुभाष लाला यांनी कार्यशाळेत दोन्ही दिवसांचे उद्घाटन केले आणि ते स्वतः दोन्ही दिवस ह्या कार्यशाळेत हजर होते. दोन्ही कार्यशाळेमध्ये उपस्थिती चांगली होती आणि ह्या कार्यशाळांची विस्तृत प्रसिद्धी मुद्रणालयातून तसेच इलेक्ट्रॉनिक मिडीया माध्यमातून करण्यात आली होती.

## कोठडीतील मृत्यू संबंधी कार्यशाळा

४.१९ कोठडीतील मृत्युसंबंधी पोलीस आयुक्त, पुणे यांनी १५ व १६ जून २००७ रोजी कार्यशाळा आयोजित केली होती. आयोगाचे सन्मा. सदस्य आणि न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी ह्यांनी कार्यशाळेचे उद्घाटन केले आणि उपस्थितीना संबोधित केले ह्या कार्यशाळेसाठी पुणे जिल्ह्यातून कार्यरत पोलीस अधिकारी उपस्थित होते. माननीय सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या ११ महत्त्वाची मार्गदर्शक तत्त्वांचे महत्त्व अधोरेखित केले गेले यामध्ये अटक व स्थानबद्धतेच्या प्रकरणामध्ये एक मानवी दृष्टिकोन घेण्याबाबत जाणीव व जागृती निर्माण केली गेली.

## सेमिनार – शिवाजी विद्यापिठ कोल्हापूर

दिनांक १९ मार्च २००८ रोजी शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर यांनी एक चर्चासत्र आयोजित केले होते. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी आयोगाचे सन्माननीय सदस्य श्री. टी. सिंगारवेल हे होते आणि त्यांनी लिंग समानता आणि मानवी हक्क संरक्षण यावर भाषण दिले.

## जागतिक मानवी हक्क दिवस साजरा

४.२१ "जागतिक मानवी हक्क दिन" हा दिनांक १० डिसेंबर २००७ रोजी आयोगातर्फे साजरा केला गेला त्यावेळी आयोजित केलेल्या एका उच्च चहापानाच्या कार्यक्रमास अनेक मान्यवरांना आमंत्रित केले होते. या कार्यक्रमात त्यावेळेस आयोगाचे कामकाज सुधारण्यावर, आयोगाच्या आदेशाची योग्य रितीने अमंलबजावणी करण्याबाबत चर्चासत्र घेण्यात आले.

## मानवाधिकार आयोगाचे लघुनाट्य डाक्युमेंटरी

४.२२ आधी सांगितल्याप्रमाणे आयोगाने नेमलेल्या विद्यार्थी सामाजिक कार्यकर्ता दुसऱ्या योग्य जागी वरील आयोगाच्या जाणीवेतून कनेक्टवर काम केले. एक तरूण मुलगा आणि त्याचा ब्ररश ही छोटीसी कथा नाट्य यात पोलीस व आयोग काम करण्यास तयार होते. माहितीपट नाटक देखील शैक्षणिक संस्थामध्ये आयोजित करण्यात आले होते. आणि त्यातील काही भागांचे सादरीकरण छोट्या पडद्यावर झाले आहे.

## भाग ५

### प्रशासकीय काम आणि तर्कसंगतीचे समर्थन

५.१ मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे. सामाजिक न्याय आणि मानवी हक्क तत्त्वे यांना एकमेकांबरोबर जावे लागेल कारण प्रत्येक व्यक्तीला मतभेद निरोगी मार्गाने विचारात घ्यावे लागतील आणि प्रासंगिक दृष्टीकोन आणि मतभेद हे टाळले पाहिजे. आणि त्यातील फरक जाणणे आवश्यक आहे. असे सर्व भारतीयांनी केले तर मानवी हक्कांच्या प्रकरणात पाहणी करण्यासाठी त्यांना जास्त वाव मिळेल. मानवी हक्क आयोग आधीची जी प्रकरणे आहेत ती कमी करण्यासाठी मदत करील.

५.२ महाराष्ट्र सरकारचा शासन निर्णय क्र. एच आर सी./०९९/३७८/पी ओ एल-१४, दिनांक १५ जानेवारी २००० द्वारे महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाची स्थापना केली. आयोग ६ मार्च २००१ रोजी कार्यान्वयीत झाला. आयोगाने १२ मार्च २००१ रोजी पासून प्रत्यक्ष कामकाज करण्यास सुरवात केली शासन निर्णयात असे सांगितले की, या आयोगाची देखभाल करण्यासाठी एक अध्यक्ष व आयोगातील तीन सदस्य असतील आणि यांचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असेल. दिनांक २१ ऑगस्ट २००७ पर्यत मा. न्यायमुर्ती श्री. सी. एल थुल हे आयोगाचे वर्षाकरिता तात्पुरते अध्यक्ष होते. न्यायमूर्ती क्षितीज व्यास यांची दिनांक २१ ऑगस्ट २००७ रोजी आयोगाचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती झाली आणि त्यांनी त्यांचा पदाचा कार्यभार स्विकारला. न्यायमूर्ती ए.व्ही.सावंत जे दिनांक १२ मार्च २००१ ते दिनांक १२ एप्रिल २००२ पर्यंत आयोगाचे अध्यक्ष होते. श्री. सुभाष लाला, श्री. टी. सिगारवेल आणि न्यायमूर्ती व्ही. जी. मुन्शी यांनी त्यावर्षासाठी आयोगाचे सदस्य म्हणून काम पाहिले.

### कर्मचारी

५.३ आयोगाचे कर्मचारी बहुदा वेगवेगळया/ विविध विभागात काम करीत आहेत जसे प्रशासकीय विभाग, लेखा विभाग, अन्वेषण विभाग, विधी विभाग आणि संशोधन विभाग डॉ. आर. सी. सागर यांनी दिनांक २८ डिसेंबर २००७ पर्यंत आयोगाचे सचिव म्हणून काम पाहिले आणि त्या नंतर श्री. बी. एम. राउत, विशेष पोलीस महानिरिक्षक यांनी अतिरिक्त सचिव म्हणून कार्यभार सांभाळला. श्री. बी. एन. राउत यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक म्हणून सतत काम केले. या वर्षी आयोगाने तीन नवीन अधिकाऱ्यांच्या नेमणूक केल्या प्रबंधक, सहाय्यक प्रबंधक आणि संशोधन अधिकारी, श्रीमती नीना खापर्डे ह्या दिनाक १६ ऑक्टोबर २००७ पासून आता पर्यंत रजिस्ट्रार या पदावर कार्यरत आहेत. डॉ.जयश्री पाटील ह्या दिनाक १९ नोव्हेंबर २००७ पासून संशोधन अधिकारी या पदावर कार्यरत आहेत. श्री. आर. डी. शिरसाट हे सहाय्यक प्रबंधक म्हणून दिनाक २२ ऑक्टोबर २००७ पासून या पदावर कार्यरत आहेत.

### परिसर

महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक एचआरसी १०९९/३७८/पोल - १४, दिनांक १५ जानेवारी २००० द्वारे नमूद केले की, महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे मुख्य कार्यालय मुंबई येथे असेल. त्याप्रमाणे शासनाने कित्येक जागा देऊ केल्या ज्यामध्ये न्यू ॲडमिनीस्ट्रेटीव बिल्डींग, मंत्रालयासमोर, वरळी गव्हर्नमेंट सर्व्हिस, अरुण चेंबर्स ताडदेव, मुबई, न्य ॲडमिनिस्ट्रेटीव बिल्डिंग, बांद्रा (पूर्व) व ओल्ड कस्टम हाऊस, मुंबई येथे दिल्या किंवा देऊ केल्या शेवटी परिपत्रक क्रमांक जी-ए/११.०१/ सी एन १५/२००१/२२, दिनांक २० जून २००२ रोजी सरकारने २३८० चौ.फुट जागा प्रशासकीय स्टाफ कॉलेज इमारत परिसर ९, हजारीमल सोमानी मार्ग सी. एस. टी. समोर, मुंबई ४०० ००१ येथे आयोगाला दिली, ती पूर्वी वित्त आयोगाने व्यापली होती. आयोग त्याच जागेमध्ये कार्य करीत आहे.

### साधन संपती .—

चालू वर्षी एप्रिल २००७ ते मार्च २००८ वर्षाकरिता शासनाने उपलब्ध असताना निधी १ करोड ४३ लाख ३३ हजार रुपये निधी उपलब्ध करून दिला त्यापैकी एकूण खर्च १ करोड ५३ लाख ४८ हजार ९१५ एवढा झाला.

## भाग ६

### उदाहरणार्थी प्रकरणे

१. प्रकरण क्रमांक. ३३९१/२००७-०८

तक्रारदाराचे नाव.—

(१) डॉ. किरीट सोमय्या

(२) श्री. मधुकर धर्मा खुताडे

(३) श्री. हरिश्चंद्र सखाराम भोये

प्रतिवाद्याचे नाव.—

(१) महाराष्ट्र शासान

(२) मुख्य सचिव महाराष्ट्र शासन, मंत्रालय

(३) सचिव, नागरी पुरवठा, आणि ग्राहक सुरक्षा विभाग, मंत्रालय.

(४) सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय.

आदेशाचा दिनांक.— १४ नोव्हेंबर २००७

उपस्थिती (गणसंख्या).— सन्मा. अध्यक्ष श्री. क्षितिज व्यास

सन्मा. सदस्य श्री. सुभाष लाला

**प्रकरणांचे स्वरुप .**— याचिकाकर्ता हे संसदेचे माजी सदस्य आहेत. याचिकाकर्ता २ व ३ हे रहिवासी व ठाणे येथील कपडे विक्रेते लोक आहेत. महाराष्ट्राचा ग्रामीण भाग सरकारी कल्याणकारी योजनेवर अवलंबून आहेत. त्यांना जेवण पी.डी. एस. माध्यमातून वाटले जाते. यानी विविध वस्तू सर्वेक्षणासाठी थेट आयोगाशी संपर्क साधला आहेत. याचिकाकर्त्याची तक्रार अशी आहे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेने असे ज्ञेषित केले आहे की, सरकारी गहू कनिष्ठ दर्जाचा पुरविलेला असून तो वापरासाठी योग्य नाही.

**आयोगाने केलेली कारवाई.**—श्री. बक्षी, प्रधान सचिव, यांच्या मते राज्य शासनाने दिनांक ३१ ऑक्टोबर २००७ पासून पी. डी. एस. साठी लागू करण्यात आलेले वितरण थांबविणे आवश्यक होते आणि जिल्हा अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या की राज्य सरकारकडे शिल्लक असलेल्या स्टॉकचे प्रयोगशाळेत विश्लेषण करणे.

**निर्णय.**—मानवाला जीवन जगण्यासाठी खाण्यायोग्य अन्न पुरविणे त्यासाठी अशी शिफारस केली होती की, राज्य सरकारने भविष्यात गहू आयात करताना आणि/किंवा कोणतेही अन्न व अन्नपदार्थ असा प्रयत्न केला पाहिजे की ते मानवी वापरासाठी योग्य दर्जाचे आहे आणि ते पी.इ.ए. नियमाप्रमाणे आहे.

(२) प्रकरण क्रमांक. ३३८९/२००७-०८

तक्रारदारांची नावे.— श्री. सुरेश मंगल, बालाजी मित्र मंडळ, कोरबा मिठागार, महात्मा फुले वाडी, वडाळा (पू).

प्रतिवाद्याचे नाव.— पोलीस उप आयुक्त, पोर्ट झोन, मुंबई

आदेश दिनांक.— ११ ऑक्टोबर २००७

गणसंख्या (उपस्थित).— सन्मा. अध्यक्ष श्री. क्षितिज व्यास.

**प्रकरणांचे स्वरुप.**—तक्रारदाराचे असे म्हणणे आहे की, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हे, कोरबा मिठानगर, महात्मा फुले वाडी, वडाळा (पू) येथील बालाजी मित्र मंडळाने साजरा करण्यास परवानगी नाकारली आहे. पोलीस अधिकाऱ्यानी असे निवेदन केले की तक्रारदार हा कोणत्याही मंडळाचा अध्यक्ष नाही, तसेच त्यामुळे त्याला सदरची तक्रार दाखल करण्याचा अधिकार नाही तसेच या संबंधित कोणताही अर्ज आद्याप पर्यत

दाखल झालेला नाही. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी त्यांनी मंडळाला वरील कार्यक्रम घेण्यास प्रतिबंध केले आहे. कार्य चालू ठेवण्यासाठी त्याला मंडळातर्फे प्रतिबंधित केले आहे. या प्रकरणात दोन्ही पक्षकारात मैत्रिपूर्ण समझोता करण्यात आला. तक्रारदाराने शांतता व सुव्यवस्था राखण्याचे आणि शांततेने उत्सव साजरा करण्याचे मान्य केले. त्यांनी मा. जिल्हाधिकाऱ्यांनी उत्सव साजरा करण्याबाबत मंडळाने दिलेली पावती दाखल करण्याचे मान्य केले. तसेच मंडळ नोंदणी करण्यासाठी योग्य अधिकाऱ्याकडे अर्ज करण्याचे मान्य केले.

**निर्णय.–** तक्रारदाराला ९ दिवस नवरात्रीचा उत्सव त्याच ठिकाणी सांजरा करण्याची परवानगी दिली गेली आहे.

**(३) प्रकरण / क्रमांकः ३८९०/२००७-०८**

**तक्रारदाराचे नाव.–** श्री. रॉबर्ट दास ॲन्थनी, जिल्हा ठाणे

**प्रतिवदिचे नाव.–** पोलीस आयुक्त, ठाणे

**आदेशाची तारिख.–** १७ जानेवारी २००८

**गणसंख्या (उपास्थित).–** मान्य. अध्यक्ष श्री. क्षितिज व्यास.

**प्रकरणांचे स्वरुप.–** तक्रारदाराने वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बनकर, पोलीस निरीक्षक श्री. बनगर आणि निरीक्षक अधिकारी श्री. रोडे हे सेंट्रल पोलीस स्टेशन, उल्हासनगर येथे संलग्न असून त्याचे विरुद्ध भ्रष्टाचार गैरप्रकारची बाबत आरोप केले आहेत. तक्रारदाराची अशी तक्रार होती की, आरोपी श्री. जगदिश बजाज ह्याच्या घरात जप्ती करताना पोलीसांनी खोटा पंचनामा तयार केला तसेच रक्कम ४ लाखाची अफरातफर केली व आरोपीकडून १० लाख रुपयांची लाच घेतली. आणि आरोपीला जामिन मिळण्याच्या उद्देशाने गुन्ह्यातून कलम ४६७ वगळून मदत केली. शिवाय तक्रारदाराने नंतर असेही सागितले की ह्या प्रकरणाची तक्रार मान. उप मुख्यमंत्री आणि गृहमंत्री महाराष्ट्र शासन, पोलीस आयुक्त, ठाणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक भ्रष्टाचार ब्युरो, ठाणे, पोलीस आयुक्त, झोन चार करून सुद्धा उल्हासनगर यापैकी कुणीही या प्रकरणात लक्ष दिले नाही.

**कार्यवाही.–**तक्रारीत नमूद केलेल्या आरोपात आयोगाने पोलीस उप आयुक्त याना शिफारस केली आहे की, उपायुक्त झोन-४, उल्हासनगर यांनी आरोपांची चौकशी करावी. तक्रारदाराला व पोलीस आधिकाऱ्याला त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन वरील आरोपामध्ये उप आयुक्त दोषी आढळल्यास त्यानी कायद्याप्रमाणे पुढील कारवाई करावी.

**(४) प्रकरण क्रमांकः ३७८८/२००७-०८**

**तक्रारदाराचे नाव.–** मुरलीधर गंगारामानी, उल्हासनगर ठाणे

**प्रतिवदीचे नाव.–** (१) म्युनिसिपल आयुक्त, उल्हासनगर म्युनिसिपल कार्पोरेशन
(२) पोलीस आयुक्त, ठाणे

**आदेशाची तारिख.–** ९ जानेवारी २००८

**कोरम/गणसंख्या.–** सन्मा. अध्यक्ष श्री. क्षितिज व्यास.

**तक्रारीचे स्वरुप.–** तक्रारदार, राजावीर मंदिरचे विश्वस्त आहेत. ते असा दावा करतात की, त्याना सदर मंदिराच्या पश्चिमेला जीना ठेवण्याचा अधिकार आहे. त्यानी पुढे असेही म्हटले आहे की २ फुट उंचीच्या ४ पायऱ्या बांधल्यामुळे कोणालाही अडचण होणार नाही किंवा त्यामुळे कोणालाही त्रास होणार नाही.

**कार्यवाही.–**सुनावणीच्या दिवशी असे लक्षात आले की, उल्हासनगर महानगरपालिकेने तक्रार नगररचना विभागाकडे अग्रेषित केली आहे आणि तक्रारदारानेसुद्धा ह्या बद्दल तशी माहिती दिली तक्रारदाराच्या वकिलाने असे प्रतिपादन केले की, तक्रारदाराने नगररचना विभागाला तशी परवानगी २००६ मध्ये परंतु या प्रकरणात काही निर्णय घेतला नाही.

**निर्णय.–**या आयोगाने अशी शिफारस केली आहे की, तक्रारदाराने नगररचना विभाग, उल्हासनगर, म्युनिसिपल कार्पोरेशन याचेकडे योग्य प्रकारे व छायांचित्रासहीत विनंती करून हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत नगररचना अधिकारी यांनी तक्रारदार. उल्हासनगर महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी आणि इतर या प्रकरणात रस असणारे लोक यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी देऊन अर्ज मिळाल्यानंतर चार आठवड्यांच्या आत तक्रारदाराला ऐकून घेण्याची संधी दिल्यानंतर त्यांनी घेतलेला निर्णय तक्रारदाराला दोन आठवड्यात कळवावा.

(५) प्रकरण क्र: १४६२/२००७-०८

तक्रारदाराचे नावः— श्री. नारायण दामोदर पाके.

प्रतिवादीचे नावः— (१) कलेक्टर, रायगड

(२) ग्रामपंचायत - एकदारा, रायगड

आदेशाची तारीखः— १२ डिसेंबर २००७

गणसंख्याः— सन्मा. सदस्य, न्यायमूर्ती व्ही. जी. मुनशी.

**प्रकरणाचे स्वरूपः**—तक्रारदार हा एकदारा गाव, तालुका मुरूड, जंजिरा येथील रहिवासी आहे. तो एकदारा ग्रामपंचायतीच्या हद्दीत राहणार असून त्याचे मतदार यादीत नाव समाविष्ट आहे. सरकारने पाणी योजना सन २००२-०३ साली संमत केली होती. परंतु त्यानंतर ती अस्तित्वात आली. तक्रारदार हा त्या भागातील रहिवासी व मतदार होता म्हणून तो नळजोडणीद्वारे पाणी मिळण्यास पात्र होता. असे असून सुद्धा ग्रामपंचायत या ना त्या कारणांमुळे तक्रारदारांला पाणी देत नाही.

**आयोगाकडून करण्यात आलेली कारवाई** — कलेक्टर — रायगड जिल्हा यांना नोटीसद्वारे असे विचारण्यात आले की तक्रारदाराला पाणीपुरवठा का करण्यात आला नाही? याचा खुलासा करावा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड त्यांनी त्या संदर्भात या प्रकरणात केलेल्या कारवाईचा अहवाल दाखल केला. या प्रकरणात तक्रारदाराने असे नमूद केले आहे की त्याला पाण्याची जोडणी ही २ डिसेंबर २००७ रोजी दिली गेली. त्यामुळे ग्रामपंचायतने अशाप्रकारे त्यांची जबाबदारी संपली त्यामुळे ग्रामपंचायतीने जाणीवपूर्वक पाण्याची जोडणी देण्यास विलंब केल्यामुळे तक्रारदाराला नुकसानभरपाई म्हणून दर दिवशी रू. १०० प्रमाणे ग्रामपंचातीने द्यावे असे सांगितले.

**आयोगाकडून घेण्यात आलेला निर्णयः**—आयोगाने दिलेल्या कारणे दाखवा नोटीसीत सांगितल्या प्रमाणे आज्ञाधारकपणे तक्रारदाराला (पाणी कनेक्शन) नळजोडणी दिल्यामुळे आता या प्रकरणात निर्णय घेण्याची काहीही आवश्यकता नाही. आम्ही अशी आशा करतो की तक्रारदाराला नियमितपणे पाणीपुरवठा होऊन भविष्यात तो अखंडित राहील अशी आम्ही आशा करतो. त्यानुसार या परिस्थितीत ही केस समाप्त करण्यात आली.

(६) प्रकरण क्रमांक ११३/३२/२००५-०६

तक्रारदाराचे नावः— राहूल मधूकर थुल, पानगडी, ता. कळंब

प्रतिवादीचे नावः— पोलीस अधीक्षक, यवतमाळ (ग्रामिण)

आदेश दिनांकः— ७ सप्टेंबर २००७

गणसंख्या/उपस्थिती— सन्मा. सदस्य न्यायमूर्ती व्ही.जी.मुन्शी, सदस्य

**तक्रारीचे स्वरूपः**—तक्रारदार बस स्टॅण्ड जवळ आपल्या मॅटॅडोअर सोबत हजर होता. प्रतिवादी अचानक तेथे आला आणि त्याने तक्रारदाराला मुठीने आणि लाथाबुक्यांनी मारण्यास सुरूवात केली त्याच्या वाहनाची मोडतोड केली आणि जबरदस्तीने तक्रारदाराचे रू. ६०० घेतले. ही घटना पोलीस स्टेशनमध्ये दिनांक १७ जानेवारी २००६ रोजी १९-४० वाजता यातील डायरीमध्ये अनु क्र. ४८ वर लिहिण्यात आली. पुढील दिवशी त्याला दवाखान्यात यवतमाळ येथे नेण्यात आले आणि तो दिनांक १८ जानेवारी २००६ ते दिनांक २६ जानेवारी २००६ पर्यंत दाखल होता. पोलिसांनी सदर घटना ही विचारात न घेतल्यामुळे तो नाराज झाला होता.

**आयोगाकडून करण्यात आलेली कारवाई** - पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडून अहवाल मागविण्यात आला होता. त्यांच्या मते सो एक दखलपात्र गुन्हा नव्हता आणि त्या आधीच प्रतिवादीच्या यु/एस-१०७, सीआर पी.सी विरोधात प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

**आयोगाचा निर्णयः**—आयोगाने या प्रकरणात तपासपूर्ण करण्यासाठी तपासणी अधिकारी यांना निर्देश दिले आहेत की आरोपीने कोणताही दखलपात्र गुन्हा केल्यास त्याच्या विरुद्ध आरोपपत्र दाखल करावे.

(७) प्रकरण क्र.- ३३८६/२००७-०८

तक्रारदाराचे नावः— श्रीम. तानुबाई रामदास शिंदे, चेंबूर, मुंबई

प्रतिवादीचे नावः— (१) अधीक्षक, गणे, सेंट्रल जेल

(२) मुख्य वैद्यकीय अधिकारी,ठाणे,सेंट्रल जेल

(३) सर्जन/अधिकारी,व्ही.एस.जिल्हा सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे

(४) पोलीस उपायुक्त - झोन - ६, मुंबई.

आदेशाची तारीखः— २ जानेवारी २००८

गणसंख्या/उपस्थितीः— मान. अध्यक्ष श्री. क्षितिज व्यास

**प्रकरणाचे स्वरूपः–** तक्रारदाराने आपल्या तक्रारीत असा आरोप केला आहे की तिचा २६ वर्षांचा तरूण मुलगा जो मासे पकडण्याची लाकडी चौकट बनवित होतो त्याचा गुन्हा यु/एस ३२६ आयपीसी नुसार ठाण्यातील मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले होते. तिने त्याच्या जेल मधील दुःखद मृत्युबद्दल शंका व्यक्त केली होती.

**आयोगाने केलेली कारवाईः–** अधीक्षक, ठाणे सेंट्रल जेल आणि पोलीस उपायुक्त झोन-६, चेंबूर मुंबई यांना आयोगाद्वारे नोटीस जारी केली. त्या सूचनेचे पालन करून त्यांनी अहवाल व वैद्यकीय केस पेपर्स दाखल केले. सुनावणीच्या काळात आयोगाने वरिष्ठ जेलर तसेच मुख्य वैद्यकीय अधिकारी, ठाणे सेंट्रल जेल, ठाणे, डॉ. मिसेस रानडे ह्यांनी मृत्युवर उपचार केले होते. ह्याचे जबाब घेतले. अहवाल वरून, वैद्यकीय केस पेपर्सवरून आणि रेकॉर्ड केलेल्या जबाबाबदद्ल मृत व्यक्ती ही काविळीने आजारी असल्याने अशक्त झाला होता. परंतु ४६ वर्षांचा तरूण मुलगा हा एका दिवसात मृत्यु होऊ नाही शकत. आयोगाला ही निष्काळजीपणाचे प्रकरण आहे असे आढळून आले.

**दिशा निर्देशः–** या प्रकरणातील वस्तूस्थिती आणि परिस्थितीचा विचार केल्यानंतर आणि योग्य व न्याय्य वाटल्यामुळे ठाणे सेंट्रल जेल तसेच जिल्हा सिव्हिल दवाखाना, ठाणे ह्यांनी रू. ५,००० हे तक्रारदाराला द्यावेत अशी या आयोगाने शिफारस केली. हे पैसे श्रीमती तनुबाई रामदार शिंदे यांना २ महिन्यात द्यावेत. तक्रारदाराला नुकसान भरपाई मिळविण्यासाठी दिवाणी न्यायालयात संपर्क साधून इतर उपलब्ध उपायांचा आधार घेण्याची मुभा असेल.

**(८) प्रकरण क्रं.** स्वयंमखुद प्रकरण-३/२००७-०८ आणि

| | |
|---|---|
| **प्रकरण क्रमांकः–** | ४२०१/२००७-०८ |
| **तक्रारदाराचे नावः–** | मोहन कृष्णन |
| **प्रतिवाद्याचे नावः–** | राष्ट्रीय भ्रष्टाचार विरोधी आणि गुन्हे प्रतिबंध परिषद |
| **आदेशाची तारीखः–** | १२ डिसेंबर २००७ |
| **गणसंख्या/ उपस्थितीः–** | विभागीय खंडपीठ, मान.अध्यक्ष श्री. क्षितीज व्यास आणि सन्मा.सदस्य सुभाष लाला |

**प्रकरणाचे स्वरूपः–** श्री. अशोक धोंडू हिंदोळा, योगिताचा पिता, ह्यांनी आपल्या तक्रार अर्जात पोलीस शिपाई श्री. गायकवाड तसेच शिक्षिका श्रीम. भावना गोरुले यांच्याविरूद्ध आरोप केले आहेत की, अत्याचारग्रस्त योगिता हिने तिच्या शिक्षिकेचे मंगळसूत्र विकले या आरोपावरुन पोलीस शिपाई गायकवाड तसेच शिक्षिका भावना गोरुवले यांनी तिला पट्टयाने बेदम मारहाण केली असून योगिता हिने तिच्या शिक्षिकेचे मंगळसूत्र विकल्यामुळे आरोप आहे, त्यांनी असाही आरोप केला आहे की शाळेच्या वेळेत देखील तिच्याकडून शिक्षक काम करून घ्यायचे.

**आयोगाने केलेली कारवाईः–** कागदपत्र काळजीपूर्वक वाचल्यानंतर या आयोगाला असे आढळून आले, की या प्रकरणात अति. मुख्य सचिव, गृहखाते आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांचे म्हणणे ऐकूण घेणे आवश्यक आहे. त्या मा. आयोगाने त्यांना नोटीस पाठवून बोलावण्याच्या सूचना दिल्या आणि आयोगाला योग्य वाटतील ऐवढी नुकसान भरपाई अन्यायग्रस्त योगिता हिला का देण्यात येउ नये अशी विचारणा संबंधितांच्या नेमणूक अधिकारांकडून करून त्यांना बोलावण्याची सूचना केली. शिक्षिका श्रीमती भावना गोरुले यांनाही नोटीस दिली होती. तथापि, तिने स्वतःचे प्रतिज्ञापत्र दाखल करून तिने हा आरोप नाकारला आहे.

**सूचना/दिशाः–** आयोगाने महाराष्ट्र राज्याच्या गृह विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे यांनी प्रत्येकी रू ५००० हे अन्यायग्रस्त योगिता हिला २ महिन्याच्या आत द्यावेत. विभागीय चौकशी केल्यानंतर, अधिकारी अन्यायग्रस्त हिला दिलेली रक्कम आरोपीकडून वसूल करू शकतात.

**(९) प्रकरण क्रः ७५/८/२००६-०७/८७२४**

| | |
|---|---|
| **तकारदाराचे नावः–** | श्री. एन्. वाय नावकर<br>जाउजा रोड, नंदूरा रोड, कामगार, बदलापूर |
| **प्रतिवादीचे नावः–** | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बदलापूर |
| **निर्णय दिनांकः–** | ३० जुलै २००७ |
| **गणसंख्या/उपस्थितीः–** | सन्मा. सदस्य, श्री. टी. सिंगरवेल |

**तक्रारीचे स्वरूपः–** तक्रारदाराने ५ व्या वेतन आयोगाकडून वाढवून देण्यात आलेल्या वेतनाबाबत तक्रार नोंदविली आहे. प्रशासकीय कामामधील काही उणीवांमुळे तक्रारदारास ती वाढ देण्यास नाकारण्यात आले आहे.

**आयोगाकडून करण्यात आलेली कारवाईः–** जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास या संदर्भात नोटीस जारी करण्यात आली असून सदर प्रकरणा बाबतचा तपशील मागविण्यात आला आहे.

**आयोगाचा निर्णयः–** आयोगाने मुख्य कार्यकारी अधिकारी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने निर्णय घेतला असून ५ व्या वेतन आयोगाच्या तरतुदीनुसार वेतनामधील वाढ संमत केली आहे.

**(१०) प्रकरण क्र. ८८/३/२००६-०७/१०८३६**

**तक्रारदाराचे नावः–** श्रीमती सुरेखा वसंतराव गणसरेझाडा,
ता.धामणगाव रेल्वे, जि. अमरावती

**गणसंख्याः–** एकल खंडपीठ, माननीय सभासद, श्री. टी. सिंगारावेल

**तक्रारीचे स्वरूपः–** तक्रारदाराने अमरावतीच्या वन विभागाविरूद्ध सदर तक्रार नोंदविली आहे. दिनांक २८ नोव्हेंबर २००४ रोजी तक्रारदाराचे वडील हिंस्त्र श्वापदाने केलेल्या हल्ल्या मध्ये मृत्यू पावले आणि सदर प्रकरणात मृत्यू पावलेल्या व्यक्तिच्या कुटुंबियांस हिंस्त्र श्वापदाच्या हल्ल्यामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई करून देणे ही राज्य सरकारची जबाबदारी आहे. तक्रारदाराने असे निवेदन केले आहे की, तिच्या वडिलांसोबत बळी गेलेल्या अन्य इसमाच्या संदर्भात नुकसानभरपाई देण्यात आलेली आहे. परंतु आज पर्यंत सदर तक्रारदारास भरपाई मिळलेली नाही. म्हणूनच तक्रारदाराने आयोगाकडे सदर तक्रार नोंदीविली आहे.

**आयोगाकडून करण्यात आलेली कारवाईः–**सदर आयोगाने प्राचार्य-सचिव, वन मंत्रालय आणि संबंधित अधिकाऱ्यास (डेप्युटी कान्झर्वेटर), अमरावती यांना नोटीस जारी करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी वैद्यकीय अहवाला सोबत त्यांचा अहवाल सादर केला आहे. त्यांनी नियमानुसार नुकसानभरपाई देण्यास मान्यता दिली आहे.

**आयोगाचा निर्णयः–**तक्रारदाराचे समाधान झाल्याने सदर प्रकरण बंद करण्यात आले आहे. मा. आयोगाच्या हस्तक्षेपामुळे तक्रारदाराला न्याय मिळाला आहे.

**(११) प्रकरण क्र.: २६/२९/२००५**

**तक्रारदाराचे नावः–** रेन्डॉप हरिश्चंद्र कासलकरमु.पा.कासल,
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

**प्रतिवादीः–** जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग

**तक्रारीचा दिनांकः–** २० डिसेंबर, २००६

**गणसंख्याः–** माननीय सदस्य, श्री. टी. सिंगारावेल

**तक्रारीचा स्वरूपः–** तक्रारदार असे निवेदन करतो की, तो कुटुंबातील वरिष्ठ सदस्य असून त्याचे वडील जिल्हा परिषदेमध्ये काम करीत होते. बाल कल्याण अधिकारी म्हणून ते काम पाहात असत. ते कर्तव्य बजावत असताना मृत्यू पावले. कुटुंबातील वरिष्ठ सदस्य म्हणून तक्रारदार सदर नोकरी मिळण्यास पात्र होता. परंतु पंचायत समितीने तक्रारदाराऐवजी त्याच्या धाकटया (लहान) भावास सदर पदावर रूजू करून घेतले आहे.

**आयोगाकडून करण्यात आलेली कारवाईः–** आयोगाने जिल्हा परिषदेस सदर प्रकरणाबाबतचा अहवाल सादर करण्यासाठी नोटीस जारी केली आहे. जिल्हा परिषदने सादर केलेल्या सदर अहवालात असे म्हटले आहे की, सदर वरिष्ठ कुटुंब सदस्य खूप दूरवर राहात आहे आणि त्यास या बाबत कोणताही हक्क प्राप्त नाही.

**आयोगाचा निर्णयः–** जिल्हा परिषदेने सादर केलेल्या सदर अहवालाच्या आधारे मानवी हक्क संरक्षण कायदा, १९९३ खंड १७(१)(ब) नुसार सदर प्रकरण बंद करण्यात आले.

**(१२) प्रकरण क्र.: १३-२६-२००६-२००७**

**तक्रारदाराचे नावः–** श्री.विनोद धोंडीराम धेंडे

**तक्रारीचा दिनांकः–** ३०/०५/ २००६,

**गणसंख्याः–** एकल खंडपीठ, माननीय सदस्य, श्री. टी. सिंगरावेल

**तक्रारीचा स्वरूपः–** सदर तक्रारदाराने असे निवेदन सादर केले आहे की, त्याचे वडील श्री. धोंडिराम बायाजी धेंडे यांना सरकारकडून मिळालेली जमीन अन्य व्यक्तिस इनाम म्हणून हस्तांतरित केली आहे. तांत्रिकदृष्ट्या अशी जमीन हस्तांतरित करता येत नाही, परंतु काही व्यक्तिनी जेंव्हा श्री. धोंडिराम यांना दारू पाजून त्यांच्याकरवी सदर जमीन हस्तांतरित करविली, तेव्हा ते शुद्धीत नव्हते.

**आयोगाकडून करण्यात आलेली कारवाईः–** सदर आयोगाने प्रकरणी नोटीस जारी करून जिल्हाधिकाऱ्यांकडून सदर प्रकरणी अहवाल मागविला आहे. सदर प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांचा अहवाल (दि. १७/१२/२००७ रोजीचा) सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने सदर प्रकरणी निर्णय संमत केला आहे.

**आयोगाचा निर्णयः–** सदर प्रकरणी जिल्हाधिकाऱ्यांनी सादर केलेल्या तपशीला च्या आधारे सदर जमिनीचे हस्तांतरण बेकायदेशीर ठरविण्यात आले आहे आणि अशा प्रकारे सदर प्रकरण बंद करण्यात आले आहे.

## भाग ७

### सुप्रीम कोर्टाच्या डी. के. बसू प्रकरणामध्ये दिलेली अकरा मार्गदर्शक तत्त्वे.

(१) जो पोलीस कर्मचारी अटक व अटक व्यक्तिची चौकशी हाताळत असेल त्याने अचूक दिसेल असे स्पष्ट ओळखपत्रं ठेवले पाहिजे, त्यामध्ये नाव व पद दाखविले पाहिजे. अशा सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना तपशील जे अटक व्यक्तीची चौकशी करीत असतात, नोंदवहीमध्ये नोंद झाली पाहिजे.

(२) जो पोलीस अधिकारी अटक व्यक्तीची अटक करीत असेल त्याने अटकेच्या वेळी टिपण/मेमो बनविला पाहिजे जो मेमो कमीत कमी एक तरी साक्षीदाराने साक्षीत केला पाहिजे, जो अटक व्यक्तीच्या कुटुबाच्यापैकी पाहिजे किंवा जेथून अटक झाली आहे त्या स्थळातील माननीय व्यक्ती असली पाहिजे. ते अटक व्यक्तीने स्वाक्षरी केलेले असेले पाहिजे व त्यामधे अटकेचा दिनांक व वेळ असला पाहिजे.

(३) अटक व्यक्ती किंवा पकडलेली व्यक्ती पोलीस ताब्यामध्ये चौकशी केंद्र किंवा कैदखान्यामध्ये असेल, त्याच्या मित्राला किंवा नातेवाईक किंवा दुसरा माणूस त्यांना ओळखणारा किंवा त्यांच्या भलाईमध्ये रस असणारा,जेवढे शक्य असेल तेवढयांना कळविले पाहिजे की ती व्यक्ती अटक आहे किंवा पकडून ठेवलेली आहे व कोणत्या ठिकाणी आहे, परंतु अटक मेमोचा साक्षीदार स्वत: अटक व्यक्तीचा मित्र किंवा नातेवाईक असेल तर तसे सांगण्याची गरज नाही.

(४) अटक व्यक्तीच्या अटकेची वेळ, अटकेची जागा व अटक व्यक्तीला जेथे ताब्यामध्ये ठेवले आहे हे सर्व पोलिसांनी जेथे व्यक्तीचा मित्र व नातेवाईक राहत असेल तेथे कळविले पाहिजे, जो जिल्ह्याच्या किंवा शहराच्या बाहेर असेल तर विधी मदत संस्था व संबंधित पोलीस ठाण्यामार्फत अटकेच्या आठ ते बारा तासामध्ये तारेने कळविले पाहिजे.

(५) अटक व्यक्ती अटकेच्या नंतर जेवढे लवकर होईल तेवढे त्याला त्याच्या हक्कांची जाणीव करून दिली पाहिजे की त्यांच्या अटकेची किंवा पकडून ठेवले आहे त्याची माहिती कोणाला तरी दिली पाहिजे.

(६) जेथे अटक केले आहे तेथे नोंदवहीमध्ये अटकेची नोंद केली पाहिजे, ज्यामध्ये अटकेची माहिती अटक व्यक्तीच्या मित्राला दिलेली आहे. त्या मित्राचे नाव व ज्या पोलीस अधिकाऱ्यांच्या ताब्यामध्ये अटक व्यक्ती आहे, त्या पोलीस अधिकाऱ्याचा तपशील दिलेला असला पाहिजे.

(७) अटक व्यक्ती, जेथे तो विनंती करीत असेल तेथे त्यांची अटकेच्या वेळी तपासणी झाली पाहिजे व ज्या काही छोटया व मोठया जखमा त्याच्या/तिच्या शरीरावर असतील तर त्याची त्यावेळी नोंद झाली पाहिजे. निरीक्षण मेमो अटक व्यक्ती व अटक करणारा पोलीस अधिकारी या दोघांनी स्वाक्षरी केलेला असला पाहिजे व त्याची प्रत अटक व्यक्तीला दिलेली असावी

(८)अटक व्यक्तीच्या वैद्यकीय तपासणी त्याच्या अटकेतील प्रत्येक ४८ तासाने शिकलेल्या डॉक्टर मान्यताप्राप्त सूची, संबंधित निर्देशक, राज्य व केंद्रीय प्रदेश, आरोग्य सेवा यांनी नेमणूक केलेला असावा. निर्देशक आरोग्य सेवा, यांनी तशी सूची सर्व तालुके व जिल्ह्यांकरिता सुद्धा तयार करावी.

(९) सर्व कागदपत्रांच्या प्रति त्यामध्ये अटक मेमो, वरती उल्लेख केलेला, न्यायधीशांनी त्यांच्या नोंदणीसाठी पाठविल्या पाहिजेत.

(१०)अटक केलेल्या व्यक्तीला त्याच्या चौकशी वेळी त्याच्या वकीलांना भेटण्याची परवानगी जरी संपूर्ण चौकशीच्यावेळी नसली तरी, परवानगी दिली पाहिजे.

(११) सर्व जिल्हे व राज्य मुख्यालयात एक कंट्रोल रुम पुरविला पाहिजे, जेथे अटक करणाऱ्या अधिकांऱ्याने अटक व्यक्तीच्या अटके बद्दल व जेथे ताब्यात ठेवलेल्या जागेबद्दल माहिती अटकेच्या बारा तासांच्या आत दिली पाहिजे व पोलीस कंट्रोल रुममध्ये दिसेल अशा सूचना फलकावर प्रदर्शित केल्या पाहिजे.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई